# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२१/०६/२०२४

**वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न,**
**मनपा अधिकारी व कर्मचारी यांनी केली योगासने**

"स्वत:साठी आणि समाजासाठी योग" ("Yoga for Self and Society") ही संकल्पना असलेल्या १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि.२१ जून, २०२४ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी योग दिनाचे आयोजन करण्यात आले. वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभाग व पालघर जिल्हा योग असोसिएशन आयोजित व यश विद्यानिकेतन यांच्या सहकार्याने १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन प्रभाग समिती 'बी' अंतर्गत विरार पूर्व येथील यश विद्यानिकेतन शाळेमध्ये करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महानगरपालिका क्रीडा विभागाचे उप-आयुक्त सदानंद पुरव यांनी उपस्थित विद्यार्थी, पालक यांना योग दिनाच्या शुभेच्छा घेऊन योगासनाचे महत्व समजावून दिले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचा सहभाग होता. सदर कार्यक्रमास महानगरपालिका उप-आयुक्त सदानंद पुरव, पालघर जिल्हा योग असोसिएशनच्या सेक्रेटरी, यश विद्यानिकेतन शाळेच्या प्राचार्या रुचिता ठाकूर, क्रीडा शिक्षक लॉसन सर, क्रीडा विभाग अधीक्षक रुपाली संखे, दिगंबर पाटील आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.

योग आता काळाची गरज आहे. योग साधनेने आजार कमी होतात. योग साधना मन प्रसन्न ठेवते. "तणाव मुक्तीसाठी रोज योग करू व निरोगी राहू" असा संदेश उप-आयुक्त सदानंद पुरव यांनी उपस्थितांना दिला व शुभेच्छा दिल्या.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या प्रभाग समिती स्तरावर, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा, महाविद्यालये, योग प्रशिक्षण संस्था, विविध सेवाभावी संस्थामध्येही आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी विविध योगासन करून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका